# बृहन्मुंबई महानगरपालिका

## दुकाने व आस्थापना

**<u>क्र.सीआय/6831/एसईए/ओडी,दि.15/03/2017.</u>**

**<u>परिपत्रक</u>**

**विषय:- दुकाने व आस्थापना अधिनिमातंर्गत आस्थापना नोंदणीकरण, नुतणीकरण तसेच फेरबदल इत्यादीसाठी अनुसरावयाची ऑनलाईन कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करणेबाबत**

**संदर्भ :- क्र. सीआय / 5107 / एसईसी, दि. 26.12.2016**

**क्र. उप आयुक्त/विशेष/2984,दि.21.03.2017**

1. उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये ऑनलाईन कार्यपद्धतीने नोंदणीकरणासाठी प्राप्त अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडल्याबाबत व सर्व पद्धतीने योग्य असल्याची खात्री करुन लगेचच नोंदणी मंजूर करावे अशी सूचना देण्यात आलेली आहे. सदर बाबीची अंमलबजावणी करताना आस्थापनेच्या नामफलक/इमारतीचे छायाचित्र समाधानकारपणे ऑनलाईनद्वारे तपासण्यास अडचणी येत असल्याने ब-याच प्रकरणांत मंजूरीचा निर्णय प्रलंबित राहतो. सबब त्याबाबत अशा सूचना देण्यात येत आहेत की, अशा छायाचित्रातील अस्पष्टता व त्रुटी मुळे नोंदणी देण्याचे प्रकरण प्रलंबित ठेवण्यात येऊ नये. अन्य कागदपत्रे म्हणजे अर्ज, पॅनकार्ड व हमीपत्र योग्य आढळल्यास अर्ज प्राप्तीच्या दिवशीच नोंदणी देण्यात यावी. आस्थापनेचा नामफलक/ इमारतीबाबत खातरजमा स्थळभेटीच्या वेळी करावी.

2. माहिती व तंत्रज्ञान विभागाने आस्थापनांना दुकाने व आस्थापना कायद्याप्रमाणे ठेवावयाच्या नोंदवहया संगणकावर अपलोड करुन इंटरनेटद्वारा निरीक्षकांना तपासणीसाठी उपलब्ध करण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे. त्यामुळे ज्या आस्थापना या सुविधेचा फायदा घेतील त्यांच्या नोंदवहया तपासणीसाठी निरीक्षकांना स्थळभेटी देणे आवश्यक राहणार नाही. या सुविधेचा जास्तीच जास्त वापर आस्थापनांनी घ्यावा यासाठी निरीक्षकांनी दुकाने व आस्थापना मध्ये नोंदवहया अपलोड करण्याचे प्रात्यक्षिके आयोजित करुन त्याबाबत दुकाने व आस्थापनाच्या नियोक्त्यांना सदर सुविधा वापरण्यास उधुक्त करावे. प्रत्येक प्रशासकिय विभागाने अशी किमान २५ प्रात्यक्षिके पूर्ण करण्याचे उदिष्ट पूर्ण करुन त्याचा अहवाल संबंधीत दुकाने व आस्थापनांचे पत्त्यांसहित प्रमुख निरीक्षक (दुकाने व आस्थापना) बृ.मु.म.न.पा. यांना सादर करावा.

3. आस्थापनाचे नोंदणीकरण व फेरबदलाची सूचना ऑनलाईन पद्धतीद्वारे करतांना व त्यासाठीचे शुल्क भरतांना नियोक्त्यास येणा-या अडचणींबाबत तक्रार अर्जदार payment@mcgm.gov.in या इमेल आयडीवर करु शकतात त्याबाबत अर्जदारास माहिती देण्यात यावी.

| | |
|---|---|
| **Sd/-** | **Sd/-** |
| **Dt.23.03.2017** | **Dt.23.03.2017** |
| **श्री.अ.द.गोसावी** | **श्री.प्रकाश पाटील** |
| **प्रमुख निरीक्षक** | **उप आयुक्त** |
| **(दुकाने व आस्थापना)** | **(विशेष)** |